आजचा शुभ विचार

“"बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-20 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 21 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २० ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. २१ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## “मनोज जरांगेने संपूर्ण मराठा समाजाचं प्रचंड नुकसान केलं आहे ”; छगन भुजबळ यांचं वक्तव्य

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

अजित पवार हे आमच्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी निर्णय घेतला म्हणूनच मी मंत्रिमंडळात आलो. अजित पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल आणि संपूर्ण राष्ट्रवादी पक्षाचा मी आभारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचाही आभारी आहे असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

**मी माझा पक्ष सोडलेला नाही-छगन भुजबळ**

आमचे किती मतभेद असले तरीही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार गट हा मी सोडलेला नव्हता. आगामी काळातही आमच्या पक्षाला चांगलं यश मिळावं म्हणून आम्ही प्रयत्न करणार आहोत. मंत्रिपदाची जबाबदारी दिली गेली आहे. खातं कुठलं? अजून काही जबाबदारी द्यायची असेल तर तो निर्णय मुख्यमंत्र्यांचा असतो असंही



भुजबळ म्हणाले आहेत. त्यानंतर त्यांनी मनोज जरांगेंबाबतही भाष्य केलं.

**मनोज जरांगेंबाबत काय म्हणाले छगन भुजबळ?**

“मनोज जरांगेने चुका नाही तर खिळे केले आहेत. महाराष्ट्रातल्या संपूर्ण मराठा समाजाचं प्रचंड नुकसान केलं आहे. गावागावांमध्ये त्यामुळे मराठा समाजालाही निश्चितपणे त्रास झाला. मराठा समाज हा सगळ्यात मोठा बांधव म्हणून महाराष्ट्रात राहतो, पण ह्या जरांगेच्या कर्तृत्वामुळेच निश्चितपणे मराठा समाजालाच त्रास झाला आहे.” असं भुजबळ यांनी म्हटलं आहे.

**मनोज जरांगेंनी काय म्हटलं होतं?**

छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली किंवा नाही घेतली हा त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. छगन भुजबळ मंत्री झाले याचा आम्हाला काहीच फरक पडत नाही. अजित पवार जातीयवादी लोकं पोसायचं काम करत आहेत, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच अजित पवार प्रचंड मोठी चूक करत आहेत. याच्या परिणामाला त्यांना सामोरे जावं लागेल, असा थेट इशारा देखील मनोज जरांगे यांनी दिला.

**राजभवन या ठिकाणी छगन भुजबळांचा शपथविधी**


राज्यातील महायुती सरकारमध्ये आणखी एका मंत्र्याचा समावेश झाला असून राजभवन येथे आज राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आमदार छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यापूर्वी झालेल्या महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यात छगन भुजबळ यांचं नाव वगळण्यात आल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. तर, भुजबळ यांनी देखील जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली होती. मात्र, धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर आता छगन भुजबळ यांची पुन्हा मंत्रिमंडळात वर्णी लागली आहे.

## ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांनी 86 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञानप्रसारक डॉ. जयंत नारळीकर यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी झोपेतच अखेरचा श्वास घेतला. भारतीय खगोलशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या नारळीकरांनी सामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचवण्याचे कार्यही अविरतपणे केले. चार दशकाहून अधिक कालावधीपासून जयंत नारळीकर यांचे खगोलभौतिकी क्षेत्रात संशोधन सुरू आहे. त्याच बरोबर त्यांनी अनेक पुस्तकं देखील लिहिली आहेत. सामान्य माणसाला खगोलशास्त्र समजवण्यासाठी त्यांनी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले. त्यांच्या



'यक्षांची देणगी' या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. त्याचप्रमाणे डॉ. जयंत नारळीकर यांनी सर फ्रेड हॉएल यांच्यासोबत 'कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी' मांडली. असे हे मराठमोळे शास्त्रज्ञ वृद्धापकाळामुळे काळाच्या पडद्याआड गेले आहेत. त्यांच्या पश्चात गीता, गिरिजा व लीलावती या तीन मुली आहेत.

जयंत नारळीकर यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागात प्रमुख म्हणून पद भूषवले आहे. तसेच १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली होती. जयंत नारळीकरांचा जन्म कोल्हापूर येथे जुलै १९, १९३८ रोजी झाला. त्यांचे वडील, रॅंग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ञ तर त्यांचीआई सुमती विष्णू नारळीकर ह्या संस्कृत विदुषी होत्या. तर त्यांच्या पत्नी मंगला नारळीकर गणितज्ञ होत्या. ज्यांचे दोन वर्षांपूर्वीच निधन झाले आहे. प्रतिष्ठित सांख्यिकीशास्त्रज्ञ व्ही. एस. हुजुरबाजार हे जयंत नारळीकर यांचे मामा होते. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी येथे झाले. इ.स. १९५७ साली त्यांनी विज्ञानात पदवी (B.Sc.) प्राप्त केली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज येथे गेले. तेथे त्यांना बीए, एमए व पीएचडीच्या पदव्या मिळाल्या. शिवाय, रॅंग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल, स्मिथ पुरस्कार व इतर अनेक बक्षिसे मिळाली.

## महाराष्ट्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय! राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------

छगन भुजबळ यांच्या शपथविधी कार्यक्रमानंतर, त्याच्या पाठोपाठ देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ बैठक घेण्यात आली. ज्यामध्ये अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यात महाराष्ट्र सरकारने गृहनिर्माण क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल उचलत नव्या गृहनिर्माण धोरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी दिली आहे. राज्यातील सर्वसामान्य लोकांच्या निवाऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरकारने हा महत्वपूर्ण ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाची आज सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे बैठक पार पडली आली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मंत्रीमंडळात नव्याने समावेश झालेले छगन भुजबळ, राज्याच्या मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभागाच्या अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव उपस्थित होते. यादरम्यान अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. ज्यामध्ये प्रामुख्याने राज्याचं नवं गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, " गृहनिर्माण धोरणाच्या माध्यमातून 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेला प्रत्यक्ष अंमलबजावणीत आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. हे धोरण सर्वसमावेशक असणार असून ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगार अशा विविध समाजघटकांचा समावेश यात करण्यात आला आहे. राज्यातील वाढते शहरीकरण आणि घरांची वाढती मागणी लक्षात घेता, सर्व समाजघटकांसाठी सुरक्षित व परवडणारी घरे या धोरणाच्या माध्यमातून उपलब्ध होतील." प्रस्तावित गृहनिर्माण धोरणाचा सर्वंकष आराखडा मंत्रिमंडळ बैठकीत सादर



करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

**आजच्या बैठकीत एकूण आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ते खालीलप्रमाणे:**

या मंत्रिमंडळ बैठकीत गृहनिर्माण विभागाव्यतिरिक्त, जलसंपदा विभागाअंतर्गत चार प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. तसेच विधी व न्याय विभागक, नगरविकास विभाग, उद्योग विभागांच्या प्रत्येकी एका प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली.

**राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर**

'माझे घर-माझे अधिकार' या ब्रीदवाक्यासह राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात आले आहे. याअंतर्गत ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. ज्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम राबविले जाणार असून. यात अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्यासाठी विशिष्ट गरजांचा धोरणात प्राधान्याने विचार केला जाईल.

**नगरविकास विभाग**

बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी महानगर गॅस लिमिटेड कंपनीला बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार आहे.

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

उद्योग विभागाच्या अंतर्गत धोरण कालावधी संपुष्टात आलेल्या धोरणांतर्गत विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी दिली जाईल.

**विधी व न्याय विभाग**

वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथ दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. यासाठी एकूण १८ पदनिर्मितीला तसेच १.७६ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

**जलसंपदा विभाग**

• सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या ₹५३२९.४६ कोटींच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. ज्याद्वारे एकूण ५२,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

• अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी २०२५.६४ कोटींच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. यामुळे ५,३१० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

• पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ६३९४.१३ कोटींच्या रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील शिलार गावातील प्रकल्पाला मान्यता देण्यात आली असून ४,८६९.७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## अनैतिक संबंध ठेवणाऱ्या पत्नीला पोटगी नाही; उच्च न्यायालयाचा महत्वाचा आणि ठाम निर्णय!

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------

विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या महिलेच्या पोटगीच्या मागणीला छत्तीसगढ उच्च न्यायालयाने साफ नकार दिला आहे. “व्याभिचार करणाऱ्या पत्नीला कुठल्याही प्रकारचा भत्ता मिळण्याचा अधिकार नाही,” असा स्पष्ट आणि ठाम निर्णय न्यायालयाने दिला आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

२०१९ साली पारंपरिक हिंदू पद्धतीने विवाह झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत म्हणजे २०२१ मध्ये संबंधित महिलेने पतीचं घर सोडलं आणि घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. सप्टेंबर २०२३ मध्ये या दोघांमध्ये अधिकृत घटस्फोट झाला. यानंतर, महिलेने कुटुंब न्यायालयात मिळालेल्या १६,००० रुपये पोटगीत वाढ करून २०,००० रुपये दरमहा मिळावी, असा अर्ज उच्च



न्यायालयात दाखल केला. पतीचं मासिक उत्पन्न १ लाख असल्याचा दावा तिने याचिकेत केला होता.

**पतीकडून धक्कादायक आरोप!**

पतीच्या वकिलांनी न्यायालयात गंभीर आरोप करत सांगितले की, महिलेचे तिच्या दिरासोबत अनैतिक संबंध होते. जेव्हा पतीने आक्षेप घेतला, तेव्हा ती भांडण करून कुठल्याही कारणाशिवाय घर सोडून गेली. शिवाय, पतीने त्याचे उत्पन्न केवळ १७,१३१ असल्याचेही स्पष्ट केले.

**कुटुंब न्यायालयात झाले होते आरोप सिद्ध**

या प्रकरणातील व्याभिचार सिद्ध झाल्याचे कुटुंब न्यायालयात ठरले होते. त्यामुळे उच्च न्यायालयानेही याच निर्णयावर शिक्कामोर्तब करत महिलेला कोणतीही पोटगी मिळणार नसल्याचे स्पष्ट केले. महिलेच्या वकिलांनी तिला तिच्या भावाच्या घरी राहते, त्यामुळे तिचे अनैतिक संबंध असणे शक्य नाही, असा युक्तिवाद केला. मात्र न्यायालयाने तो फेटाळून लावत पतीच्या बाजूने निर्णय दिला.

**न्यायालयाचे स्पष्ट मत**

“ज्या पत्नीने अनैतिक संबंध ठेवले, पतीच्या घरात न राहण्याचे कोणतेही कारण न देता घर सोडले, अशा महिलेचा पोटगीवर काहीही अधिकार राहत नाही,” असा स्पष्ट आणि नजरेत भरणारा क्रांतिकारी निकाल न्यायालयाने दिला आहे.

## येत्या 1 जूनपासून 'या' दोन राज्यांमध्ये थिएटर बंद होण्याची शक्यता

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

दक्षिणेकडील दोन राज्यांमध्ये येत्या १ जूनपासून थिएटर बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे टॉलिवूड इंडस्ट्रीला मोठा झटका मिळण्याची शक्यता आहे. आंध्रप्रदेश आणि तेलंगाणा या दोन राज्यांतील थिएटर पूर्ण बंद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. राजस्व मॉडेलच्या माध्यमातून मालकाला अपूरे भाडे मिळत असल्यामुळे आंध्रप्रदेश आणि तेलंगाणा या दोन राज्यांतील सिंगल-स्क्रीन थिएटर बंद करण्याची घोषणा करण्यात आली आहे. एक्झिबिटर्स असोसिएशनसोबत झालेल्या पहिल्या संयुक्त बैठकीत, प्रदर्शकांनी टक्केवारी-आ धारित मॉडेलमधील बदलाला पाठिंबा दर्शविला. त्यासोबतच औपचारिकपणे थिएटर्स बंद करण्याच्या निर्णयाला सहमती दर्शविली आहे. प्रदर्शक संघटनेच्या बैठकीत सुमारे ६० प्रदर्शक



उपस्थित होते. ज्यात दिल राजू आणि सुरेश बाबू सारख्या फिल्म इंडस्ट्रीतील दिग्गज कलाकारांचा समावेश होता. याशिवाय, अनेक प्रमुख चित्रपट वितरक आणि निर्मातेही अनुपस्थित होते. दरम्यान, या प्रस्तावावर इंडस्ट्रीतल्या लोकांमध्येच अंतर्गत मतभेद असल्याचे पाहायला मिळत आहे. आंध्रप्रदेश आणि तेलंगाना या दोन्हीही राज्यातील सिंगल स्क्रिन थिएटर्स बंद करण्याच्या निर्णयाला अधिकृत जर मंजूरी मिळाली, तर बड्या सेलिब्रिटींच्या चित्रपटांच्या प्रदर्शनावर परिणाम होऊ शकतो. येत्या, १२ जून रोजी कमल हासन यांचा 'ठग लाईफ' प्रदर्शित होणार आहे. पवन कल्याण यांचा 'हरि हरा वीरा मल्लू' हा चित्रपटही रिलीज होणार आहे. सिंगल-स्क्रीन थिएटर्सला आता कदाचित फार मोठ्या वितरणाच्या समस्यांना तोंड देण्याची शक्यता आहे. परंतु मल्टिप्लेक्सला याचा त्रास होणार नाही, ते चित्रपटाची स्क्रिनिंग कायम ठेवू शकता. चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर लगेचच ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांबद्दलही प्रदर्शकांनी चिंता व्यक्त केली आहे. प्रदर्शकांनी विनंती केली आहे की, ज्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केलेली आहे, ते चित्रपट लवकर ओटीटीवर रिलीज करु नये अशी विनंती करण्यात आली आहे. फिल्म चेंबरला औपचारिक निवेदन सादर करण्यात येणार असून तोडगा काढण्यासाठी १ जूनच्या आधीच चर्चा अपेक्षित आहे, येत्या काही दिवसांत आता थिएटर्सबाबतीत आणि ओटीटी रिलीज बाबत कोणता निर्णय होतो, हे पाहणं महत्तवाचे ठरणार आहे

संपादकीय

# सजग मराठी पालकांसाठी.....

लहानपणी चांदोबासारखे मासिक शाळेच्या वाचनालयात जाऊन वाचणे हा आमचा मधल्या सुट्टीचा आवश्यक भाग होता. त्यातल्या गोष्टी, रंगीत चित्रे हे सर्व आम्हाला अतिशय आवडायचे. अलीकडच्या काळात वयमसारखे मासिक मुलांना आवडेल असे आहे. मराठीत मुलांच्या मासिकांची संख्या एकूण कमीच आहे. पण दर महिन्याला घरी असे खास आपल्याकरता मासिक येणे, मुलांनी त्याची वाट पाहणे आणि आल्यावर त्यात बुडून जाणे हे अत्यंत सकारात्मक चित्र आहे. ज्या पालकांना हे जमेल ती मुले सुदैवी! मराठीतून शिक्षण विषयक कोणती मासिके प्रकाशित होतात? या प्रश्नाचे उत्तर शोधताना अत्यंत मोजकी नावे समोर येतात. शिक्षण संक्रमण, शैक्षणिक संदर्भ ही नावे गेल्या काही वर्षांत लक्षात राहिलेली आहेत. छापील स्वरूपातील अंक प्रकाशित करणे दिवसे न दिवस कठीण होत चालले आहे. कारण खर्च अधिक आणि मागणी कमी अशी स्थिती आहे. यामुळे डिजीटल स्वरूपातील अंकाचा पर्याय समोर आला आहे. 'ग्राममंगल शिकणवेध' हा अंक शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा अंक म्हणून नावारूपाला आला आहे. याचे कारण म्हणजे रमेश पानसे यांच्यासारख्या निकोप शिक्षणविचार करणाऱ्या माणसाने त्याचे संगोपन केले. गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या अवतीभवतीचे जग झपाट्याने बदलत गेले आहे. विविध क्षेत्रांमध्ये सखोल संशोधनातून मोठी क्रांती झालेली आहे. आपल्या जगण्याच्या पद्धती आणि शैलीत केवढी तरी उलथापालथ झालेली आहे. असुरक्षितता, अनिश्चितता, जुन्या मूल्य विचारांची पडझड या सर्व परिस्थितीत आजचे शिक्षण कसे असायला हवे हा कळीचा प्रश्न आहे. हाच विचार शिक्षणवेध सारखे मासिक मांडते आहे. उच्चशिक्षण हा विषय बालशिक्षणाच्या भक्कम पायावर आधारित आहे. पूर्वी शिक्षकाने त्यास प्राप्त ज्ञान विद्यार्थ्यांना देणे आणि त्यांनी ते ग्रहण करणे असा विचार केला जायचा, पण आता हा विचार बदलून ज्ञानरचनावादी विचार पुढे आला. त्यानुसार शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा आणि कुतूहलाला जागे ठेवून शिकण्यास अनुकूल वातावरण उभे करून द्यायचे आहे. ज्ञान मिळवण्यासाठी उत्सुक विद्यार्थी स्वतंत्र बुद्धीने विचार करणारा हवा. त्याला अनेक प्रश्न पडले पाहिजेत. त्याकरिता तो सतत सजग हवा आणि मुक्तपणे शिकत राहण्याची प्रेरणा जोपासणारा हवा. असे विद्यार्थी घडण्यात पालक व शिक्षकांचे योगदान कसे असायला हवे, हे 'ग्राममंगल शिक्षणवेध' मधून मांडले जाते आहे. पालकांना गाईड, क्लाससारख्या गोष्टी मुलांकरिता हव्या असे वाटते. हे इतके टोकाला गेले आहे की, मुलांची उपजत शिकण्याची प्रेरणा संपवून परजीवी विद्यार्थी घडवले जात आहेत. एखादे मासिक घरी सुरू करणे हे पालकांना महाग का वाटते? लहान मुलांचे शिक्षण नीट झाले तर समाजविकास योग्य दिशेने होईल, त्यामुळे अशा मासिकांना जगवणे ही सामुहिक जबाबदारी आहे. उचित शिक्षण विचाराचे वारे खेळते ठेवण्याकरिता एवढे करूयाच!

# दिवसेंदिवस वाढत्या आगीच्या घटना अत्यंत चिंताजनक

देशात दिवसेंदिवस आगीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.यात काही नैसर्गिक तर काही मानवी चुकांमुळे आगीच्या घटना घडतांना दिसतात.तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली.या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला ही भयावह घटना अंगावर शहारे येणारी आहे.ही घटना शॉटसर्कीटमुळे झाल्याचे सांगितले जाते.ही आग चारमिनार या गजबजलेल्या परिसरातील एका इमारतीतील तळघरात अचानक आग लागली आणि बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले व आगीचे लोण वरच्या मजल्यावर पसरले आणि आगीने विक्राळ रूप धारण करू १७ लोकांचा बळी घेतला व अनेक जण जखमी झाले.याच दिवशी सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्रीज या टॉवेल कारखान्याला रविवार १८ मे रोजी पहाटे ३.३० ते ४ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली व क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि अग्नितांडव सुरू झाले.यात ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले.या दोन्ही घटनांमध्ये २५ नागरिकांचा मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.परंतु आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.परंतु चारमिनार परिसरातील आग असो अथवा सोलापुरातील टॉवेल कारखान्याला लागलेली भीषण आग असो या दोन्ही आगीच्या घटना मानवी चुकांमुळे झाल्याचे दिसून येते.कारण शॉटसर्कीट का होते याचे मुख्य कारण म्हणजे इलेक्ट्रिक विभागाकडून ऑडिट न करने किंवा इलेक्ट्रिकची तपासणी न करता त्याकडे दुर्लक्ष केल्याने शॉटसर्कीटचे प्रकार राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वाढत आहे.म्हणजेच इलेक्ट्रिकच्या बाबतीत टेक्नीकल फॉल्टकडे दुर्लक्ष केल्याने अशा भयावह घटना नेहमीच घडत असतात व यामुळे जीवीत हाणी मोठ्या होत आहे.वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिकीकरण, गगनचुंबी इमारती,वातानुकूलित संयंत्र याठिकाणी आगीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.बदलते हवामान, वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यांमुळे होणाऱ्या आगीच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने या घटनांकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.कारण एक आगीची घटना करोडोंची वित्तीय हानी तर होतेच सोबतच मोठ्या प्रमाणात जीवित हानी सुध्दा होतांना आपण पहातो ही जीवीत हानी कदापि भरून काढता येत नाही.याकरीता देशातील संपूर्ण राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने अग्निशमन विभागाला सशक्त करून अत्याधुनिक यंत्र सामग्री ताबडतोब अग्निशमन विभागाला पुरविने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे अग्निशमन विभागात मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची कमतरता दिसून येते त्याचीही पुर्तता सरकारने युध्दपातळीवर करने अत्यंत गरजेचे आहे. कारण मनुष्यबळा शिवाय कोणतेही काम शक्य नाही.त्याचप्रमाणे बदलत्या काळानुसार अत्याधुनिक यंत्रसामग्रीची नितांत गरज आहे आणि आगीच्या वाढत्या घटना पहाता औद्योगिक परिसरात आणि गर्दीच्या ठिकाणी अग्निशमन व्यवस्था सक्तीची करायला हवी.कारण राज्यात किंवा देशात छोट्या-मोठ्या आगीच्या घटना दररोज कुठे ना कुठे होतांना आपण पहातो आणि यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व जीवीत हाणी होत आहे ही अत्यंत गंभीर व संवेदनशील बाब आहे यावर राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व आगीच्या घटना टाळण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करण्याची नितांत गरज आहे.चारमिनार परिसरातील व सोलापूर इंडस्ट्रीज मधील आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या प्रती श्रद्धांजली अर्पण करतो.जय हिंद.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# दरोडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

## विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि कर्तृत्व अलौकिक - व्याख्याते प्रा. महेंद्र गायकवाड सर यांचे प्रतिपादन!

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला बहाल केलेल्या संविधानामुळे सर्व जाती धर्मांना जमातींना समान अधिकार या संधी प्राप्त झाल्या. केवळ याच कारणाने आपला देश एकसंघ असल्याचे प्रतिपादन व्याख्याते प्रा. महेंद्र गायकवाड सर यांनी केले.पारनेर तालुक्यातील दरोडी गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त धम्मचक्र युवा मंच व समस्त ग्रामस्थ दरोडी यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी व्याख्याते प्रा. गायकवाड यांनी उपस्थितांना संबोधित केले. व्याख्यानापूर्वी गावचे सरपंच दिनेश चौगुले यांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संपूर्ण जगभरामध्ये सर्वात आदर्श संविधान तयार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाचा नावलौकिक जगभरात पसरविला. जगामध्ये देशाची मान सन्मानाने उंचविण्याचे काम त्यांनी केले. विश्वशांती दूत भगवान गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून आपले जीवन कार्य व्यतीत केले. त्यांची शिकवण देश हितासाठी सदैव उपयोगी पडेल. म्हणून या महामानवांची जयंती आपण साजरी करत आहोत. हे आपले कर्तव्याबरोबर परम भाग्य असल्याचे प्राध्यापक गायकवाड म्हणाले. जयंतीनिमित्त महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच खास आकर्षण म्हणजे याप्रसंगी आपली आई दिवंगत सीताबाई बाबुराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ यांच्यासमला आयु. नीता राहुल बाबुराव गायकवाड या दांपत्याने बुद्ध विहारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्ती सस्नेह भेट देऊन त्यांची प्रतिष्ठापना त्यांची वडील आयु. बाबुराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुनील सोनवणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गणेश सोनवणे तसेच गावचे सरपंच दिनेश चौगुले व सामाजिक कार्यकर्ते संग्राम पावडे उपस्थित होते ग्रामपंचायत सदस्य मोहम्मद मुजावर,नवनाथ बेलोटे आणि अनेक मान्यवर उपस्थित होते संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन लक्ष्मण गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्तविक राहुल गायकवाड यांनी केले. सर्वांचे आभार राजू गायकवाड यांनी मानले. याप्रसंगी अनेक भीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांना स्वादिष्ट भोजन देण्याचे पुण्य कर्म मंचाचे खजिनदार लक्ष्मण गायकवाड त्याचप्रमाणे हरेश गायकवाड आणि भाऊसाहेब गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी धम्मचक्र युवा मंचाचे साहेबराव गायकवाड, कचर गायकवाड, सुदाम गायकवाड, संदीप गायकवाड, विक्रम गायकवाड, आकाश गायकवाड, चिंतामण गायकवाड, दीपेश गायकवाड, राजू गायकवाड या सर्वांनी मोलाचे योगदान दिले.

# शहीद जवान सचिन वनंजे यांच्या कुटूंबियांची पालकमंत्री अतुल सावे यांनी घेतली सात्वंनपर भेट सर्वोतोपरी मदत करण्याची ग्वाही

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------




देगलूर तालुक्यातील तमलूर या गावाचे भुमिपूत्र शहीद जवान सचिन यादवराव वनंजे यांच्या कुटूंबियाची राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज देगलूर येथील त्यांच्या घरी सात्वंनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी काळजी करु नका, शासन सदैव आपल्या पाठीशी असून, मी स्वत: लक्ष घालून सर्व मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीन अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाशक कुमार, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सूर्यवंशी, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीलिमा कांबळे आदिची उपस्थिती होती.

देगलूर तालुक्यातील तमलूर या गावाचे भुमिपूत्र शहीद जवान सचिन यादवराव वनंजे यांचे ६ मे रोजी श्रीनगर येथे कर्तव्यावर असतांना मृत्यू झाला. भारतीय लष्करातील जवान सचिन यांचा मृत्यू ही अतिशय दु:खद घटना आहे. सचिन यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून त्यांच्या पत्नीला व भावाला त्यांच्या शिक्षणानुसार नोकरीसाठी योग्य ती मदत करण्यात येईल. तसेच त्यांना शासनाच्या योजनेच्या माध्यमातून पक्के घरकुल देण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले. त्यांच्या पेन्शनची कार्यवाही व शासनाकडून इतर सर्व देय मदत व लाभ वेळेत मिळतील यादृष्टीने मी स्वत: पाठपुरावा करीन असेही त्यांनी यावेळी सांगितले. याबाबत मदत त्वरीत मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे, अशी सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी केली. यावेळी त्यांनी त्यांचा एक महिन्याचा पगाराचा धनादेश शहीद जवान सचिन वनंजे यांच्या कुटूंबियांना सुर्पूद केला.

# खान्देशाचे सुपुत्र सुधाकर सोनार लिखित 'समर्पण' उत्तरार्ध आत्मचरित्राचे २६ मे रोजी मुंबईत प्रकाशन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------




न्याहळोद ता. धुळे येथील मुलनिवासी भुमीपूत्र स्वामी विवेकानंद यांच्या विचार प्रसाराला वाहुन घेतलेले मुंबई स्थित सुधाकर सोनार यांच्या ' समर्पण' ( उत्तरार्ध) आत्मचरित्र या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सोमवार दि. २६ मे रोजी सायंकाळी ४ वाजता बाळासाहेब ठाकरे समाज केंद्र हॉल, केदारनाथ मंदीरामार्ग, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व) मुंबई येथे संपन्न होणार आहे. या समारंभास प्रमुख वक्ते म्हणून खान्देशातील सुप्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. कृष्णा पोतदार, रघुनाथ विसपुते, पंकज कुळकर्णी हे लाभले आहेत. या प्रकाशन सोहळ्यात रामकृष्ण मिशन आश्रम संभाजी नगरचे सचिव, आश्रम प्रमुख श्रीमत्स्वामी विष्णूपादानंदजी महाराज, श्रीमद्स्वामी तत्व स्वरुपानंदजी महाराज आश्रम प्रमुख रामकृष्ण मिशन सकवार पालघर, श्रीमत्स्वामी सत्यदेवानंदजी महाराज अध्यक्ष रामकृष्ण मठ रामकृष्ण मिशन मुंबई हे उपस्थित राहुन आशीर्वाद देणार आहेत. समारंभाच्या निवेदिका डॉ. मिनल परांजपे या आहेत. या प्रकाशन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक प्रा. डॉ. विजय सकपाळ, मुंबई, सौ. शुभांगी विजय सकपाळ मुंबई यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांची थट्टा मस्करी करू नका. थोडीफार माणुसकी असेल तर सरसकट पंचनामे करा

## शेतकऱ्यांना आधार देण्याची तसदी शासकीय यंत्रणा घेईल का? श्री संजय कालेश्वर बच्छाव दहिवेल

श्री प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

बळीराजा ने आपल्या शेतात राब राब राबवून पिकवलेला माल डोळ्यासमोर पावसाने वाहून नेला... ज्या देशात पाऊस आला की क्रिकेट मैदान झाकण्याची सुविधा आहे, मात्र शेतकरी राजाचा पिकवलेला माल झाकण्याची सुविधा कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नाही केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे. आणि शेतकरी राजाला जगाचा पोशिंदा म्हणतात. किती सरकार आली आणि गेली मात्र शेतकरी राजा जशाचा तसा कर्जात बुडत राहिला. मात्र आपल्याच शेतीमालावर कर वसूल करून कोट्यावधी रुपये कमावणाऱ्या बाजार समितीच्या मार्केटच्या सुधारणा मात्र कोणत्याही सरकारने केली नाही.. एका दिवसासाठी चार हजार







रुपयांच्या काशाच्या ताटात जेवणारे राज्य सरकारच्या बळीराजा च्या नुकसानीचे पंचनामे करताना अटी शर्ती लावून बळीराजाला उपाशी ठेवण्याचे काम महाराष्ट्र शासन करत असल्याचे दिसत आहे. एका एका बैठकीसाठी २०० कोटी रुपये खर्च करणारे राज्य सरकार शेतकऱ्यांना पाच रुपये देण्यासाठी ही विविध प्रकारच्या ज्याचक अटी शर्ती लावून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात सोडाच पण पंचनामाही करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा शेतकऱ्यांच्या बांधावर येण्यास धासत नाही उभे पिकांचे पंचनामे होतील काढणीला आलेल्या चे पंचनामे होणार नाही पाऊसानाने पुर्ण शेतकऱ्यांना च कंबर मोडले आहे हे निकष लावून शेतकऱ्यांना ची थट्टामस्करी प्रशासन करत आहेत थोडेफार माणुसकी असेल तर सरसकट पंचेनामे करून शेतकऱ्यांना आधार देण्याची तसदी यंत्रणा घेतील का? भरपाई मिळेल याची खात्री जरी नसलीतरी काढलेला कांद्याचे व फळं बागा इ.पिकाचे पंचानामे करण्यासाठी काय आदेश ची वाट पाहात ईतर वेळी अनेक आदेश पायमल्ली करून प्रशासन चालूच आहे की? शेतकऱ्यांना या नरक यातणे पासून वाचवा त्यांना आधार द्यावा दोन तीन दिवसान पासुन अनेक शेतकऱ्यांनची चुली सुध्दा पेटल्या नाहीत थोडेफार माणुसकी असेल तर शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती धुळे जिल्हा कार्याध्यक्ष श्री संजय कालेश्वर बच्छाव.

## महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे नांदेड विमानतळ हस्तांतरण प्रक्रियेस प्रारंभ कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी एमआयडीसी प्राधिकरणाला केल्या सूचना

### तीन महिन्यानंतर हस्तांतरणाची कार्यवाही; अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी केली विमानतळ व परिसराची पाहणी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------

नांदेड येथून सध्या अनेक मोठया शहरात विमानसेवा सुरु आहे. नांदेड येथील विमानतळ सध्या एमआयडीसीच्या ताब्यात असुन लवकरच ते महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्यात येणार आहे. यासाठी आज महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी विमानतळ परिसराची पाहणी करुन औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे एसआर मॅनेजर रोहित राहपाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी निशिकांत देशपांडे, नियोजन अधिकारी भक्ती चितळे,



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र गावडे, कार्यकारी अभियंता कल्पेश लहीवाल, मो जावेद व बेग उप अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आदीची उपस्थिती होती. विमानतळावरील विविध सुविधांबाबत औद्योगिक विकास महामंडळाने येत्या तीन महिण्यात सुधारणा करावी. विमानतळावरील अनधिकृत बांधकाम हटविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे केली. तसेच विमानतळावरील मनुष्यबळ भरती प्रक्रीया, पाणीपुरवठा तसेच विद्युत पुरवठा सुरळीत होईल यांची दक्षता घेणे. विमानतळावर प्रवाशांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधामध्ये सुधारणा करण्याबाबत सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच येत्या तीन महिण्यात या सर्व सुविधा उपलब्ध केल्या नंतर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे विमानतळ हस्तातंरणाची कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विमानतळावरील धावपट्टी, अॅब्युलन्स, अग्निशामक व इतर आवश्यक त्या वाहनाची, तसेच स्कॅनर मशिन अशा सर्व बाबीची पाहणी केली.

# वनपरिक्षेत्रात वन्यजीवांची मोजणी; काळवीट, रानडुक्करांचा मोठा सहभाग वनविभागची माहिती

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------

बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने वनविभागामार्फत मुखेड वनपरिक्षेत्रात वन्यप्राणी व पक्ष्यांची प्रगणना करण्यात आली. विशेष चंद्रप्रकाशामुळे दरवर्षी या रात्री करण्यात येणाऱ्या या मोहिमेत यंदा तब्बल ६२५ वन्यप्राणी आणि पक्ष्यांची नोंद झाली आहे. ही माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सागर हराळ यांनी दिली. मुखेड वनक्षेत्रात सुमारे ८ हजार हेक्टर वनजमीन आहे. बुद्ध पौर्णिमेच्या रात्री होणाऱ्या प्रगणनेदरम्यान यंदा १४ मचाने उभारण्यात आले होते, तसेच





ट्रॅप कॅमेऱ्यांचाही वापर करण्यात आला. यामध्ये १८५ रानडुक्कर, १७ निलगाय, ३१ वानर, ३ रानमांजरे, १५ सायाळ, ३८ ससे, १४ कोल्हे, ६५ बगळे, २१५ काळवीट व हरण, २३ मोर आणि इतर १९ वन्यजीव आढळले.

या प्रगणना मोहिमेत वनपरिक्षेत्र अधिकारी सागर हराळ यांच्यासह वनपाल अभय सेवलकर, मारोती पानगटवाड, धम्मपाल सोनकांबळे, दत्ता खरात, स्वाती मुंडे, रामदास कराड, शिवसांभ घोडके, शंकर धोंडगे, अरुण राठोड, खय्यूम शेख, शिवनंदा नागरगोजे, परमेश्वर टेकाळे, गजानन जळके, सोमनाथ पचलिंग, पांडुरंग शिरोळे, माधव गोपूलवाड, धोंडिबा मुसळे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाण्याचा प्रश्न भेडसावत असून, वन्यप्राणी पाण्यासाठी शहराच्या दिशेने वळत असल्याचे वनविभागाच्या निदर्शनास आले आहे.

# बोगस खत-बियाण्यावर कठोर कार्यवाही करा-कलंबरकर लिंकिंग व लूट थांबवण्यासाठी प्रभावी यंत्रणा राबवा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------

मुखेड - पेरणीपूर्व व पेरणी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना लागत असलेल्या खत बियाण्यांची गरज लक्षात घेवून, खत बियाणे विक्रेत्यांकडून बाजारात मोठ्या प्रमाणात अप्रमाणित/बोगस खत-बियाणे आणले जाते. यामुळे उगवण होत नाही,उत्पन्न कमी होते.यापूर्वीही बाजारात बोगस/अप्रमाणित खत-बियाणे येऊनही कृषी कार्यालय त्यांच्याकडे दुर्लक्ष करते,त्यांच्यावर कार्यवाही होत नाही.अशी शेतकऱ्यांची भावना आहे.सरकारकडून सांगितले जाते की, बोगस/खत बियाण्यावर कठोर कार्यवाही करू पण कृषी कार्यालय कार्यवाहीकडे दुर्लक्ष करतंय.हे



सर्व लक्षात घेऊन बाजारात येणारे बोगस/अप्रमाणित खत-बियाण्यावर कठोर कार्यवाही झाली पाहिजे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी कृषी कार्यालयाकडे केली आहे. शेतकऱ्यांना खत/बियाणे देतांना लिंकिंग मोठ्या प्रमाणात केली जाते. "हे घेतल्याशिवाय हे मिळत नाही." किंवा "हे यवढे घ्या हे यवढे देतो." मोठ्या प्रमाणात चालते याकडे कृषी कार्यालय दुर्लक्ष करतंय.त्यासोबत कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने खत बियाण्यांची विक्री केली जाते.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक नेमले पाहिजेत.भरारी पथकाकडून देखील नियंत्रण ठेवले जात नाही.यामुळे कृषी कार्यालयावर देखील प्रश्नचिन्ह उभा राहतोय.याकडे उच्च अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन भरारी पथकावर देखील कार्यवाही केली पाहिजे तर प्रभावीपणे काम होईल.शेतकऱ्यांना खत बियाणे विक्रेत्यांकडील साठ्याची माहिती मिळाली पाहिजे. कृषी कार्यालयाने केवळ कागदी कार्य न दाखवता, शेतकऱ्यांची होणारी लिंकिंग, लूट आणि बोगस बियाण्याची फसवणूक थांबवणारी यंत्रणा प्रभावीपणे राबवावी अशी मागणी शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी केली, यावेळी दिनेश पाटील केरूरकर उपस्थित होते.

# नाशिकमध्ये मुसळधार! झाडांची पडझड, निम्मे शहर अंधारात; सिन्नरमध्ये वीज पडून एकाचा मृत्यू

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

मंगळवारी सायंकाळी शहरासह ग्रामीण भागास पुन्हा मुसळधार पावसाने झोडपले. अनेक भागात झाडे व फांद्या पडल्या. प्रमुख रस्ते व चौकात पाणी साचल्याने सर्वत्र वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र होते. गंगापूर रोड, पंचवटीतील अमृतधाम परिसर, सिडको आदी भाग रात्री उशिरापर्यंत अंधारात बुडाले होते. ग्रामीण भागात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने घरांचे पत्रे उडाले. सिन्नर तालुक्यात सोनगिरी येथे वीज पडून ३४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. मागील दोन आठवड्यांपासून जिल्ह्यात पावसाने दाणादाण उडवली होती. मंगळवारचा दिवसही त्याला अपवाद राहिला नाही. तीन तासात शहरात ३०.६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. अल्पावधीत मुसळधार पाऊस झाल्यामुळे पेठ रोड, दिंडोरी रस्त्यासह शहरातील अनेक प्रमुख



रस्ते व चौकांना तलावाचे स्वरुप झाले. अमृतधाम, रेडक्रॉस, शालीमार, डिसुझा कॉलनी आदी १२ ठिकाणी झाडे व फांद्या पडल्या. यामुळे सायंकाळी ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. पाण्यातून मार्गक्रमण करताना वाहनधारकांना कसरत करावी लागली. डिसुझा कॉलनीत पडलेल्या झाडाखाली मोटार सापडली. सुदैवाने वाहनात कुणी नसल्याने प्राणहानी झाली नाही. वादळी पावसाने महावितरणच्या वाहिन्या व यंत्रणांचे नुकसान झाले. परिणामी, अनेक भागात सहा ते सात तास वीज पुरवठा खंडित होता. सिन्नर, नांदगाव, निफाड, नाशिक तालुक्यात वादळी पाऊस झाला.

**वीज पडून एकाचा मृत्यू**

सिन्नर तालुक्याती ल सोनगीर येथील रवींद्र बोडके (३४) यांचा वीज पडून मृत्यू झाला. कळवण तालुक्यात भेंडी गावात शांताराम साळवे यांच्या घराचे पत्रे उडून गेले. नांदगाव येथे बाळू मेंगाळ यांचा बैल वीज पडून मृत्यू झाला. पावसामूळे आतापर्यंत ७५ जनावरांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात तब्बल एक हजार ८२ घरांची पडझड झाली. त्र्यंबकेश्वर, बागलाण, सुरगाणा तालुक्यात रस्ते, पूल आदी नऊ सार्वजनिक मालमत्तांची हानी झाल्याचे सांगितले जाते.

**वीज यंत्रणेची हानी**

आकस्मिक आलेला पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे अनेक भागात मोठी झाडे थेट विद्युत वाहिन्यांवर उन्मळून पडल्याने तारा तुटून विद्युत पुरवठा खंडित झाला. यंत्रणेवर पडलेली झाडे, फांद्या बाजूला काढून वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी अभियंते जनमित्र व कर्मचारी कार्यरत असल्याचे महावितरणने म्हटले आहे. जिल्हा रुग्णालय विद्युत उपकेंद्रातील झाड कोसळल्याने संपूर्ण उपकेंद्राचा वीज पुरवठा खंडित झाला. तशीच स्थिती घारपुरे घाट, पंचवटी पोलीस ठाण्यासमोर, म्हसोबा मंदिर समोर झाड पडल्याने झाली. दिंडोरी रोडवरील एकतानगर, सद्गुरु नगर, सातपूर एमआयडीसीमधील नाइस आणि कॉलेज रोडवरील विशाल पॉईंटजवळ विद्युत यंत्रणेवर झाड पडल्याने गंगापूर रोडवरील वीज पुरवठा खंडित झाला. बळवंत नगर, मखमलाबाद, चांदशी गाव येथेही झाडे पडल्याने वीज पुरवठा प्रभावित झाला आहे.

# जयेश जोगदंड याचे दहावी सीबीएससी बोर्ड मध्ये घवघवीत यश

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------

नुकताच इयत्ता दहावी CBSE बोर्ड परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून नारायणा इंग्लिश स्कूल नांदेड येथील विद्यमान विद्यार्थी जयेश जगदीश जोगदंड या विद्यार्थ्यांने इयत्ता १० वी च्या सीबीएसई बोर्ड परीक्षा २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत ५०० पैकी



४७० गुण म्हणजेच ९४% टक्के गुण घेऊन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाला आहे. विशेष म्हणजे या विद्यार्थ्याने मराठी विषयात १०० पैकी १०० गुण घेऊन शाळेत पहिला नंबर येण्याचा मान मिळवला आहे. हा विद्यार्थी जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल मुखेडचा माजी विद्यार्थी आहे. त्याच्या या यशाबद्दल जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल मुखेड चे संचालक तथा आजोबा ज्ञानोबा जोगदंड, आजी शकुंतला जोगदंड , प्राचार्य जगदीप जोगदंड, आईवडील शिल्पा जगदीश जोगदंड, शीतल जोगदंड, व्यंकट जोगदंड, गंगाधर जोगदंड, सुधाकर जोगदंड यांसह मित्रपरिवार , नातेवाईक यांनी त्याचे हार्दिक अभिनंदन केले आहे. या यशामुळे संपूर्ण जोगदंड पाटील परिवारासह शाळेचा, शिक्षकांचा आणि गावकऱ्यांचा अभिमान उंचावला आहे. सर्वत्र त्याच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

PASSWORD PROTECTED PAGE